# प्रकरण I

## प्रस्तावना

## प्रकरण I

## 1.1 प्रस्तावना

महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, 1961 च्या कलम 3 अन्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना (ऑगस्ट 1962) महाराष्ट्र राज्यातील उद्योगांची जलद आणि सुव्यवस्थित स्थापना, वाढ आणि विकास याला प्रोत्साहन देण्यासाठी आणि मदत करण्यासाठी केली. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य उपक्रम पुढीलप्रमाणे आहेत:

- महाराष्ट्र शासनाने (तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने अधिग्रहित केलेली जमीन) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या ताब्यात ठेवलेल्या जमीनीवर औद्योगिक क्षेत्रांच्या पद्धतशीर विकासासाठी आराखडा तयार करणे यात समाविष्ट आहे. त्यात विकास नियंत्रण नियमांमध्ये विहित केल्यानुसार औद्योगिक आणि सहाय्यक क्रियाकलापांसाठी (सुविधांसह) औद्योगिक क्षेत्रांमध्ये सिमांकित भूखंड कोरून लेआऊट तयार करणे समाविष्ट होते;
- रस्त्यांचे बांधकाम, जलपुरवठा प्रणाली, गटाराची व्यवस्था, पथदिवे, कचरा/ सांडपाण्यावर प्रक्रिया करणारे संयंत्र, अग्निशमन स्टेशन *इत्यादी* द्वारे औद्योगिक क्षेत्रांचा विकास;
- उद्योजकांना भाडेतत्त्वावर भूखंड/शेडचे वाटप विनिर्दिष्ट प्रयोजनासाठी (औद्योगिक/व्यावसायिक/निवासी/सुविधा) *इत्यादी* आणि हस्तांतरण, पोट भाड्याने देणे, विकास कालावधी वाढवणे *इत्यादीसाठी* परवानगी देणे;
- औद्योगिक क्षेत्रांमध्ये विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून भूखंडधारकांद्वारे उद्योगांची स्थापना आणि इमारतींचे बांधकाम नियंत्रित करणे; आणि
- औद्योगिक क्षेत्रांमध्ये प्रदान केलेल्या पायाभूत सुविधांची देखभाल आणि भूखंडधारकांना/ग्राहकांना पाणीपुरवठा करणे.


मार्च 2021 पर्यंत, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे 79,317 हेक्टर (हे) एवढी जमीन होती आणि 289 औद्योगिक क्षेत्रांची स्थापना केली होती, ज्यात जैव तंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान (IT), वस्त्रोद्योग, वाइन (द्राक्ष प्रक्रिया), फुलशेती इत्यादी विविध औद्योगिक क्षेत्रांसाठी विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) आणि विशेष उद्यानांचा समावेश होता.

## 1.2 संघटनात्मक संरचना

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मंडळात सध्या आठ सदस्य आहेत. मंत्री (उद्योग), महाराष्ट्र शासन *पदसिद्ध* अध्यक्ष, राज्याचे मंत्री (उद्योग), महाराष्ट्र शासन, *पदसिद्ध* उपाध्यक्ष आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) *पदसिद्ध* सचिव आहेत. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे दैनंदिन कामकाज मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या द्वारे संयुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महाव्यवस्थापक, मुख्य नियोजक आणि मुख्य लेखाधिकारी *इत्यादींच्या* सहाय्याने पाहिले जाते. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची राज्यात 16 प्रादेशिक कार्यालये आहेत, ज्यांच्याकडे भूसंपादन, औद्योगिक क्षेत्रांचा लेआऊट तयार करणे, भूखंडाचे वाटप आणि वाटपानंतरच्या क्रियाकलापांची आणि देखरेखीची कामे सोपविण्यात आली आहेत. अठ्ठावीस विभागीय कार्यालये आहेत जी पायाभूत सुविधांची कामे, देखभाल आणि सेवा/पाणी शुल्काची वसुली, इमारत आराखडा मंजुरी आणि औद्योगिक क्षेत्रांमधील भूखंडधारकांना भोगवटा प्रमाणपत्रे देण्यासाठी जबाबदार आहेत.

संघटनात्मक संरचना **आलेख 1.1** मध्ये दर्शविली आहेः

**आलेख 1.1: महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची संघटनात्मक संरचना**



## 1.3 लेखापरीक्षणाची उद्दिष्टे

कामगिरी लेखापरीक्षण हे मूल्यांकन करण्यासाठी आयोजित करण्यात आले होते की:

- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ औद्योगिक क्षेत्रांच्या निर्मितीद्वारे नियोजित आणि पद्धतशीर औद्योगिक विकासाचे उद्दिष्ट साध्य करू शकले;
- किंमत निश्चित करण्यासाठी योग्य प्रणाली अस्तित्वात होती आणि प्रचलित धोरणे/नियम/नियमनांच्या अनुषंगाने जमिनीचे वाटप वाजवी आणि पारदर्शक होते;
- योग्य किमतीत महसूल/थकबाकीची वेळेवर वसुली सुनिश्चित करण्यासाठी अंतर्गत नियंत्रण प्रणाली प्रभावी होती; आणि
- विनिर्दिष्ट उद्देशासाठी जमिनीचा वापर सुनिश्चित करण्यासाठी देखरेख प्रणाली पुरेशी आणि प्रभावी होती.

## 1.4 लेखापरीक्षणाचे निकष

लेखापरीक्षणाचे निकष खालील संसाधनांमधून स्वीकारण्यात आले होतेः

- महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, 1961 (एमआयडी अधिनियम), महाराष्ट्र औद्योगिक विकास नियम, 1962 (एमआयडी नियम), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ भूखंड विल्हेवाट नियमन, 1975 (एमआयडीसी डीएलआर) आणि विकास नियंत्रण नियमन (डीसीआर), 2009;
- भूसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्वसाहत कायदा, 2013 (एलएआरआर कायदा) मध्ये योग्य नुकसान भरपाई आणि पारदर्शकतेचा अधिकार;
- 2013 आणि 2019 चे महाराष्ट्र शासनाचे औद्योगिक धोरण;
- जारी केलेले शासन निर्णय, अधिसूचना आणि निर्देश;
- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाद्वारे जारी केलेले धोरण, नियमावली, परिपत्रके, नियमन आणि मार्गदर्शक तत्त्वे;
- वाटप/भाडेपट्टीवर कराराच्या अटी आणि शर्ती;
- भूखंड वाटप समितीचे कार्यवृत्त/निर्णय आणि अधिकारांचे प्रदान; आणि
- कार्यसूची नोंदी/ मंडळाच्या बैठकीचे ठराव.

## 1.5 लेखापरीक्षणाची व्याप्ती आणि पद्धती

कामगिरी लेखापरीक्षण 2014-15 ते 2020-21 या कालावधीत मे-डिसेंबर 2019 आणि ऑगस्ट ते ऑक्टोबर 2021 दरम्यान दोन टप्प्यांत आयोजित करण्यात आले होते. मुख्य कार्यालया व्यतिरिक्त, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या 16 प्रादेशिक कार्यालयांपैकी 11 प्रादेशिक कार्यालयांची[1] निवड राज्याच्या पाचही विभागांचा कमावलेला महसूल आणि भौगोलिक प्रतिनिधीत्व लक्षात घेऊन करण्यात आली होती.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कामगिरीचे पूर्वी पुनरावलोकन करण्यात आले होते आणि 31 मार्च 2013 रोजी संपलेल्या वर्षासाठी भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (सार्वजनिक उपक्रम), महाराष्ट्र शासनाच्या अहवालामध्ये समाविष्ट करण्यात आले होते. सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांवरील समितीने अहवालावर चर्चा केली होती (जानेवारी-जून 2019) आणि त्यांच्या शिफारशी प्रतीक्षित आहेत (ऑगस्ट 2022).

मे 2019 मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापना समवेत प्रवेश बैठक आयोजित करण्यात आली होती ज्यामध्ये लेखापरीक्षणाची व्याप्ती आणि पद्धत, लेखापरीक्षणाची उद्दिष्टे आणि लेखापरीक्षेचे निकष स्पष्ट करण्यात आले होते. 20 डिसेंबर 2021 रोजी अतिरिक्त मुख्य सचिव (उद्योग), महाराष्ट्र शासन आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या सोबत निर्गमन बैठक आयोजित करण्यात आली होती, ज्यामध्ये लेखापरीक्षण निष्कर्षांवर चर्चा करण्यात आली होती. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ/महाराष्ट्र शासनाची उत्तरे (डिसेंबर 2021/ऑगस्ट 2022) अहवालात योग्यरित्या समाविष्ट केली गेली आहेत.

महाराष्ट्र शासनाने म्हटले (डिसेंबर 2021) की मंडळाच्या सदस्यांची नियुक्ती न करण्याबाबतचे लेखापरीक्षण निरीक्षण वगळता, लेखापरीक्षा अहवालातील सर्व लेखापरीक्षण निष्कर्ष, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकार क्षेत्रात होते आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मंडळ त्यांच्या अधिकारांतर्गत कार्यवाही करत होते आणि त्यामुळे, यावर महाराष्ट्र शासनाच्या कोणत्याही टिप्पण्या नाहीत.

---

[1] अमरावती, औरंगाबाद, कोल्हापूर, महापे, नागपूर, नांदेड, नाशिक, पुणे-I, पुणे-II, ठाणे-I आणि ठाणे-II.

## 1.6 अभिस्वीकृती

कामगिरी लेखापरीक्षण आयोजित करण्याच्या विविध टप्प्यांवर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाद्वारे प्रदान केलेल्या सहकार्याची आणि सहाय्याची लेखापरीक्षण अभिस्वीकृती देते.